# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – ४११०१८
# क्रीडा विभाग - नागरिकांची सनद
# (महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७२-अ)

| अ.क्र | विषय | स्वरुप |
|---|---|---|
| 1 | **विभागाचे नाव** | क्रीडा विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका |
| 2 | **विषय** | म.न.पा. बॅडमिंडन हॉल, स्क्वॅश कोर्ट, लॉन टेनिस कोर्ट,टेबल टेनिस सरावासाठी ऑन लाईन आरक्षण करणे. |
| 3 | **ऑन लाईन आरक्षण पध्दत** | म.न.पा.च्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर Sports Venue Booking किंवा खेळाचे आरक्षण येथे आवश्यक माहिती भरून आरक्षण करता येईल. |
| 4 | **अर्जाचा नमुना मिळण्याचे ठिकाण** | --- |
| 5 | **अर्ज स्विकारण्याचे ठिकाण** | --- |
| 6 | **अंतिम निर्णयासाठी लागणारा कालावधी** | 15 मिनिटे |
| 7 | **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील ज्या कलमांचे आधारे काम करणे आवश्यक आहे ते कलम** | 1)महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 66 नुसार<br>2)महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 72(अ),(ब),(क) नुसार |
| 8 | **शासन निर्णय, आदेश, परिपत्रक, ठराव इ.** | १)मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र.क्रीडा/७/कावि/२२१/२०१४ दि.३०/६/२०१४ नुसार **लॉन टेनिस, बॅडमिंटन, स्क्वॅश कोर्टचे** सोबत दरपत्रक सादर केले आहे.<br>२) मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र.क्रीडा/७अ/कावि/१६२/२०१९ दि.७/३/२०१९ नुसार बॅडमिंटनकोर्टचे नवीन दरपत्रक |

<table>
<tr><td>9</td><td>निर्णय घेणारे अधिकारी</td><td>स्तर</td><td>पदनाम</td><td>निर्णयासाठी लागणारा कालावधी</td></tr>
<tr><td rowspan="4"></td><td rowspan="4"></td><td>पहिला स्तर</td><td>लिपिक</td><td>15 मिनिटे</td></tr>
<tr><td>दुसरा स्तर</td><td>क्रीडा पर्यवेक्षक</td><td>---</td></tr>
<tr><td>आदेश प्रमाणपत्र निर्गमित करणेस सक्षम अधिकारी</td><td>क्रीडा अधिकारी</td><td>---</td></tr>
<tr><td>चौथा स्तर</td><td>सहा.आयुक्त,क्रीडा</td><td>---</td></tr>
<tr><td>10</td><td>आवश्यक फी व त्यांचे परिपत्रक</td><td colspan="3">सोबत जोडले आहे.</td></tr>
<tr><td>11</td><td>अंतिम निर्णय विहित कालावधीमध्ये न घेतला गेल्यास ज्याना जबाबदार धरायचे आहे त्यांचे नाव व पदनाम</td><td colspan="3">त्या त्या स्तराप्रमाणे संबंधित जबाबदार राहतील.</td></tr>
<tr><td>12</td><td>सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्याचा दुरध्वनी क्रमांक</td><td colspan="3">सहा.आयुक्त, क्रीडा विभाग<br>पिंपरी चिंचवड महानगरपालिका<br>ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले स्मारक इमारत,<br>महात्मा फुले पुतळ्याशेजारी,पिंपरी चौक<br>पुणे ४११०१८<br>फोन नं.020-27439115<br>E-Mail-sports@pcmcindia.gov.in</td></tr>
</table>

सहाय्यक आय़ुक्त (क्रीडा)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८

**सोबत** - दरपत्रक

मा.महापालिका सभा ठराव क्र.३८३ दि.२२/२/२०१९ अन्वये, मा.क्रीडा,कला साहित्य व सांकृतिक समिती सभा ठराव क्र.८० दि.२५/१/२०१९ अन्वये म.न.पा.१५ बॅडमिंटन हॉलचे २० कोर्ट सराव, प्रशिक्षण व स्पर्धेसाठी आरक्षण देणेकामी,तसेच भविष्यात होणारे म.न.पा.बॅडमिंटन हॉल अनुषंगाने सुधारित क्रीडा धोरणास प्रपत्र अ व ब प्रमाणे मान्यता दिल्याने ठरावाप्रमाणे अंमलबजावणी करणेकामीचा आदेश क्र.क्रीडा/७अ/कावि/१६२/२०१९ दि.७/३/२०१९.

**प्रपत्र अ**

**अ)म.न.पा.बॅडमिंटन हॉल सरावासाठी आरक्षण करणेबाबतच्या अटी व शर्ती :-**

१. म.न.पा. बॅडमिंटन हॉलची वेळ सकाळी ५.०० ते रात्री १०.०० अशी राहील या वेळेमध्ये बदल करण्याचा अधिकार मा. आयुक्त यांना राहील.या वेळेतील सकाळी १ तासाचे २ स्लॉट व सायंकाळी १ तासाचे २ स्लॉट असे एकूण ४ स्लॉट बॅडमिंटन हॉल प्रशिक्षणासाठी राखून ठेवले जाईल.
२. म.न.पा. बॅडमिंटन हॉल सरावासाठी ऑन लाईन पद्धतीने आरक्षण दिले जाईल,याबाबतच्या आवश्यक त्या बाबींची पूर्तता बॅडमिंटन खेळाडूस ऑन लाईन पद्धतीने आरक्षण करताना करावी लागेल.
३. म.न.पा.बॅडमिंटन हॉल सरावासाठी ऑनलाईन आरक्षणासाठी निश्चित केलेल्या अटी शर्ती खेळाडूंवर बंधनकारक राहतील.
४. म.न.पा. बॅडमिंटन हॉल सरावासाठी ऑन लाईन पद्धतीने देणेकामी दर महिन्याच्या शेवटच्या दिवशी अथवा शेवटच्या दिवशी सुट्टी आल्यास माहिती व तंत्रज्ञान विभाग कळवतील त्या दिवशी दिलेल्या वेळेत बॅडमिंटन हॉल ऑन लाईन बुकिंग सुरु केले जाईल.
५. म.न.पा.बॅडमिंटन हॉल सराव,प्रशिक्षण व स्पर्धांचे दरपत्रक खालील प्रमाणे राहील.

| अक्र | आरक्षणाच्या तपशील म.न.पा.चे सर्व बॅडमिंटन कोर्ट | प्रतिदिन एक तास सराव शुल्क दर र.रू. | प्रति महिना एक तास सराव शुल्क दर र.रू. |
|---|---|---|---|
| १ | म.न.पा.शाळा,क्रीडा प्रबोधिनी विद्यार्थी | विनामुल्य | विनामुल्य |
| २ | खेळाडू दत्तक योजनेतील विद्यार्थी | विनामुल्य | विनामुल्य |
| ३ | राज्य /राष्ट्रीय खेळाडू | विनामुल्य | विनामुल्य |
| ४ | २ किंवा ४ व्यक्ती असलेल्या एकत्रित ग्रुप साठी (१८ वर्षावरील व्यक्ती ) | रु.१००/- | २,०००/ |
| ५ | म.न.पा. हद्दीतील खाजगी शाळांची मुले/मुली (२ किंवा ४ मुलांच्या एकत्रित ग्रुप साठी) १८ वर्षाखालील मुले,मुली | रु.५०/- | १,०००/- |

| अक्र | आरक्षणाच्या तपशील म.न.पा.चे सर्व बॅडमिंटन कोर्ट | प्रतिदिन एक तास सराव शुल्क दर र.रू. | प्रति महिना एक तास सराव शुल्क दर र.रू. |
|---|---|---|---|
| ६ | राज्य/राष्ट्रीय प्रशिक्षक अथवा क्रीडा संघटना यांना, प्रतिदिन ४ स्लॉट ,१ महिन्याकरिता (सार्व.साप्ताहिक सुट्ट्या वगळून) प्रशिक्षणासाठी म.न.पा.ला द्यावयाचे मासिक भाडे दर र.रू.५०००/- | | |
| ७ | म.न.पा. हद्दीतील खाजगी शाळां स्पर्धेसाठी( स.१०.०० ते ४.००) दर = र.रू.२०००/- | | |
| ८ | कंपन्या ,सॉफटवेअर कंपन्या औद्योगिक संस्था,सार्वजनिक संस्था,मंडळे,खाजगी क्लब स्पर्धेसाठी( स.१०.०० ते ४.००) दर = र.रू.५०००/- | | |

६. बॅडमिंटन हॉल स्पर्धेसाठी आरक्षण केल्यानंतर आरक्षण रद्द करावयाचे झाल्यास किमान ७ दिवस अगोदर लेखी अर्ज सादर करणे आवश्यक आहे. तरच आरक्षण शुल्क परत केले जाईल. अन्यथा एकदा भरलेले आरक्षण शुल्क कोणत्याही सबबीवर परत केले जाणार नाही.

७. बॅडमिंटन हॉल स्पर्धेसाठी पाहिजे असल्यास त्याकामीचे आरक्षणासाठी लेखी अर्ज करणे आवश्यक आहे.सदरचा अर्ज ७ दिवस अगोदर सादर करणे आवश्यक आहे. बॅडमिंटन हॉलचे सरावासाठी आरक्षण आठवड्याचे ६ दिवस दिले जात असल्यामुळे स्पर्धेसाठी फक्त साप्ताहिक सुट्टीचे दिवशी आरक्षण दिले जाईल.

८. सभासदांना बॅडमिंटन हॉल सरावासाठी, स्पर्धेसाठी , कोर्टमध्ये प्रवेश करणे पुर्वी ,सुरक्षा कर्मचारी अथवा म.न.पा.प्रतिनिधी यांचेकडे आरक्षण पावती अथवा ओळखपत्र दाखविणे बंधनकारक आहे.

९. सभासदांने बॅडमिंटन हॉल सरावासाठी,स्पर्धेसाठी, येताना स्वत:चे आवश्यक असलेले सर्व साहित्य आणणे आवश्यक आहे.

१०.खाजगी किंवा सरकारी संस्था यांनी बॅडमिंटन हॉल स्पर्धेकरीता आरक्षण करताना किमान ७दिवस अगोदर लेखी अर्ज करणे आवश्यक आहे.

११.बॅडमिंटन हॉलचे सभासद होताना किमान २ (दोन), अथवा ४ (चार), ६ (सहा), ८ (आठ) अशी सभासद संख्या असणे आवश्यक आहे.

१२.ज्या सभासदांनी आरक्षण केले आहे. त्या सभासदांनाच खेळण्यास परवानगी राहिल. त्यांच्या नावांवर दुस-या व्यक्तीस खेळता येणार नाही. आरक्षण केलेल्या सभासदाच्या नावावर दुस-या व्यक्तीचा ग्रुप खेळत असल्याचे निदर्शनास आल्यास अशा ग्रुपचे आरक्षण रद्द केले जाईल ,याकामीचेकोणतेही शुल्क परत केले जाणार नाही अशा व्यक्तींना भविष्यात पुन्हा ऑन लाईन आरक्षण करता येणार नाही.

१३.कोणत्याही सभासदास बॅडमिंटन कोर्टमध्ये अपघात, दुखापत अथवा जिवितहानी झालेस त्याची जबाबदारी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेवर राहणार नाही.

१४.बॅडमिंटन हॉल मध्ये सरावासाठी, स्पर्धेसाठी, प्रवेश करणा-या कोणतेही व्यक्तीने / सभासदाने मौल्यवान वस्तू सोबत आणू नये. कोणत्याही व्यक्तीच्या /सभासदांच्या वस्तू चोरीस गेल्यास त्याची जबाबदारी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेवर राहणार नाही.

१५.सभासदांनी भरलेल्या आरक्षण शुल्काचा  कालावधी संपले नंतर सभासदत्व आपोआप रद्द होईल.
१६.सभासदाने बॅडमिंटन हॉल मध्ये सरावासाठी आरक्षित केलेल्या वेळेतच सराव करणे आवश्यक आहे.वेळ संपताच बॅडमिंटन हॉल त्वरित रिकामा करून द्यावा लागेल.
१७.सभासदाने बॅडमिंटन हॉलमध्ये धुम्रपान करू नये..
१८.बॅडमिंटन हॉल मधील साहित्याची नासधूस अथवा मोडतोड केल्यास त्याची संपूर्ण भरपाई स्वखर्चाने सभासदास करून द्यावी लागेल.
१९.पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस जेव्हा बॅडमिंटन हॉलची आवश्यकता असेल त्या वेळेस पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत बॅडमिंटन कोर्ट उपलब्ध करून द्यावा लागेल. त्या वेळेत सभासदास सराव करता येणार नाही. व आरक्षण शुल्क परत मिळणार नाही.
२०.बॅडमिंटन हॉल मध्ये खेळताना स्पोर्टस शुज वापरणे आवश्यक आहे. तसेच खेळण्यापुर्वी ते स्वच्छ करून घेणे आवश्यक राहिल.
२१.पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अधिका-यांनी वेळोवेळी दिलेल्या सूचना व अटी सभासदांवर बंधनकारक राहतील.
२२.पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने दिलेल्या सूचनांचा अथवा नियम व अटींचा भंग केल्यास सभासदांचे सभासदत्व रद्द केले जाईल.
२३.बॅडमिंटन हॉल मध्ये गैरकृत्य, गैरवर्तन अथवा नागरिकांना त्रास होईल असे वर्तन करण्यात येऊ नये.
२४.बॅडमिंटन हॉलची साप्ताहीक सुट्टी व वेळा ठरविण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना राहील.
२५.अटी व नियमांचे पालन न करणा-या सभासदांचे सभासदत्व रद्द केले जाईल.
२६.अटी व नियमांमध्ये बदल करण्याचे अधिकार मा. आयुक्त अथवा त्यांनी नेमून दिलेल्या अधिका-यास राहतील.
२७.बॅडमिंटन हॉल काही कारणास्तव बंद ठेवण्याचा अधिकार मा. आयुक्त यांना राहिल.
२८.म.न.पा.,खाजगी शालेय विद्यार्थी, राज्य, राष्ट्रीय खेळाडू ,क्रीडा संस्था ,मंडळे ,मार्गदर्शक यांना बॅडमिंटन हॉल प्रशिक्षणासाठी सकाळी २ तास व सायंकाळी २ तास राखीव ठेवण्यात येईल. परंतू याबाबत १ महिने अगोदर लेखी अर्ज देणे आवश्यक आहे.

**प्रपत्र ब**

**ब)म.न.पा.बॅडमिंटन हॉल प्रशिक्षणासाठी आरक्षण करणेबाबतच्या अटी व शर्ती :-**

१. म.न.पा. बॅडमिंटन हॉलची वेळ सकाळी ५.००  ते रात्री १०.०० अशी राहील या वेळेमध्ये बदल करण्याचा अधिकार मा. आयुक्त यांना राहील.या वेळेतील सकाळी १ तासाचे २ स्लॉट व सायंकाळी १ तासाचे २ स्लॉट असे एकूण ४ स्लॉट एका बॅडमिंटन हॉलमध्ये एका कोर्ट प्रशिक्षणासाठी राखून ठेवले जाईल. या प्रशिक्षणाच्या ४ स्लॉट च्या वेळा ठरविण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना राहील.
२. मा. आयुक्त यांनी ठरवून दिलेल्या  ४ स्लॉट वेळे व्यतिरिक्त बॅडमिंटन प्रशिक्षणासाठी बॅडमिंटन हॉल उपलब्द करून दिला जाणार नाही.
३. बॅडमिंटन हॉल मधील  साहित्याची मोडतोड केल्यास त्याची भरपाई देण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची /मंडळाची /क्लबची राहील.

४. बॅडमिंटन हॉल प्रशिक्षणासाठी आरक्षण घेणारी संस्था क्रीडा संस्था/संघटना /मंडळ /क्लब/ कंपनी/ औद्योगिक  संस्था हे नोदणीकृत संस्था असणे आवश्यक आहे.

५. बॅडमिंटन हॉलच्या स्लॉटचे प्रशिक्षणासाठी आरक्षण घेण्यासाठी क्रीडा संस्था/संघटना /मंडळ / क्लब/कंपनी/ औद्योगिक  संस्था यांनी किमान १५ दिवस अगोदर लेखी अर्ज करणे आवश्यक आहे.उपलब्द मागणी नुसार बॅडमिंटन हॉलच्या स्लॉटचे प्रशिक्षणासाठी आरक्षण दिले जाईल.प्रथम येणा-यास प्राधान्य दिले जाईल.

६. संबंधित संस्थेस यांनी विद्यार्थी खेळाडू यांना खालील प्रमाणे प्रशिक्षण देणेकामी प्रशिक्षण शुल्क घेण्याचा अधिकार राहील

अ) Basic Training = दरमहा प्रशिक्षण शुल्क र.रु.१०००/-

आ) Intermidiate Training= दरमहा प्रशिक्षण शुल्क र.रु.१५००/-

इ) Adavance Training= दरमहा प्रशिक्षण शुल्क र.रु.२०००/-

७. भविष्यात बॅडमिंटन हॉलच्या स्लॉटचे प्रशिक्षणासाठी आरक्षण देणेबाबत ,ऑन लाईन पद्धतीने आरक्षण देण्याचे ठरल्यास, निश्चित केलेल्या अटी शर्तीनुसार ऑन लाईन पद्धतीने कमाल ११ महिन्याचे आरक्षण दिले जाईल.

८. बॅडमिंटन हॉलच्या स्लॉटचे प्रशिक्षणासाठी आरक्षण घेण्यासाठी कमाल ११ महिन्यांचा करारनामा केला जाईल.

९. बॅडमिंटन हॉलच्या स्लॉटचे प्रशिक्षणासाठी आरक्षण घेतलेल्या संस्थेने दर ३ महिन्यांनी खेळाडूंना दिलेल्या प्रशिक्षाणाबाबत प्रगती अहवाल सादर करणे आवश्यक आहे.

१०.बॅडमिंटन हॉलच्या स्लॉटचे प्रशिक्षणासाठी पुन: मुदतवाढ देणे किंवा नाकारणे याकरीता क्रीडा संस्था/संघटना /मंडळ /क्लब/कंपनी/ औद्योगिक  संस्थाचे कामकाज विचारात घेऊन पुढील मुदतवाढीचे देण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना  राहतील.

११.बॅडमिंटनहॉल इमारतीमध्ये व इमारत परीसरामध्ये बॅडमिंटन व्यतिरिक्त कोणताही वापर करता येणार नाही.तथापि इमारतीचे काही नुकसान झाल्यास ,दारे,खिडक्या इ.तुटल्यास त्याचा खर्च संबंधित क्रीडा संस्था/संघटना /मंडळ /क्लब/कंपनी/ औद्योगिक  संस्थने भरून द्यावा लागेल .

१२.बॅडमिंटन हॉलच्या स्लॉटचे प्रशिक्षणासाठी दिलेल्या क्रीडा संस्था/संघटना /मंडळ / क्लब/कंपनी/ औद्योगिक  संस्था यांना म.न.पा.बॅडमिंटन हॉलवर मालकी हक्क सांगता येणार नाही .बॅडमिंटन हॉलचा सर्वस्वी मालकी हक्क म.न.पा.चा राहील.

१३.वेळोवेळी महानगरपालिका ज्या नियम व अटी शर्थी लागू करेल त्याचे पालन करणे संबंधित क्रीडा संस्था/संघटना /मंडळ /क्लब/कंपनी/ औद्योगिक  संस्था यांना बंधनकारक राहील.

१४.बॅडमिंटन हॉल आरक्षण काळात बॅडमिंटन खेळाव्यतिरिक्त  इतर कोणत्याही कारणासाठी वापरता येणार नाही.

१५.बॅडमिंटन हॉल प्रशिक्षणासाठी दिलेल्या काळात साहित्याची विल्हेवाट लावणे /चोरीला जाणे तसेच बॅडमिंटन हॉल साहित्य कारणाशिवाय तूटफुट होणे, अगर बॅडमिंटन हॉलचा वापर

इतर कारणासाठी केल्याचे किंवा इतर गैरप्रकार जर म.न.पा .अधिकाऱ्यांचे निदर्शनास आल्यास संबंधित क्रीडा संस्था/संघटना /मंडळ /क्लब/कंपनी/ औद्योगिक संस्था यांना कोणतीही पूर्व सूचना किंवा नोटीस न देता संस्थेचा करारनामा रद्द करणेत येईल .

१६.बॅडमिंटनहॉलची संपूर्ण सुरक्षा राखण्याची जबाबदारी म.न.पा.ची राहील.

१७.बॅडमिंटनहॉल प्रशिक्षाणासाठी दिलेल्या काळात प्रशिक्षक नेमण्याची जबाबदारी क्रीडा संस्था/संघटना /मंडळ /क्लब/कंपनी/ औद्योगिक संस्था यांची राहील. व त्यांचे मानधन अदा करण्याची जबाबदारी क्रीडा संस्था/संघटना /मंडळ /क्लब/कंपनी/ औद्योगिक संस्था यांची राहील.

१८.बॅडमिंटन हॉल व परीसरात मद्यपान, धुम्रपान करण्यास सक्त मनाई राहील.

१९.बॅडमिंटन हॉल संबंधी अटी/शर्तींचा भंग झाल्यास, गैरवर्तन निदर्शनास आल्यास अथवा गंभीर तक्रार आल्यास कोणतीही पूर्व सुचना न देता आरक्षण स्लॉट रद्द करण्यात येईल.

२०.प्रशिक्षणासाठी दिलेल्या बॅडमिंटन हॉलचे, म.न.पा. ने निश्चित केलेले प्रशिक्षण शुल्क ,आगाऊ १ महिन्याचे शुल्क महिन्याचे पहिल्या आठवड्यात क्रीडा विभाग,पिंपरी चिंचवड महानगरपालिका येथे भरून त्याची पावती सुरक्षा रक्षकाससादर करावी लागेल.

२१.बॅडमिंटन हॉलची पाहणी करण्याची महापालिकेच्या सक्षम अधिकाऱ्यास मुभा राहील, त्यास संपूर्ण सहकार्य करणे हे बॅडमिंटनहॉल प्रशिक्षणासाठी घेतलेल्या क्रीडा संस्था/संघटना /मंडळ /क्लब/कंपनी/ औद्योगिक संस्था यांचेवर बंधनकारक राहील.

२२.बॅडमिंटनहॉल संबंधी असलेल्या अटी /शर्तीमध्ये वाढ करणे अथवा शिथिल करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना राहील.

२३.बॅडमिंटनहॉल परीसरात इतर कोणताही व्यवसाय करता येणार नाही .

२४.प्रशिक्षणासाठी दिलेल्या बॅडमिंटन हॉल आरक्षण काळात शासकीय अथवा महापौर चषक बॅडमिंटन स्पर्धा आयोजित केल्यास अशा वेळेस सदर बॅडमिंटन हॉल स्पर्धा काळात विनामुल्य् उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.(वर्षातुन किमान १५ दिवस )

२५.बॅडमिंटन हॉल प्रशिक्षणासाठी देण्यात आले बाबत झालेला पत्रव्यवहार हा करारनाम्याचा एक घटक आहे.

26 बॅडमिंटन हॉलच्या स्लॉटचे प्रशिक्षणासाठी दिलेल्या क्रीडा संस्था/संघटना /मंडळ / क्लब/कंपनी/औद्योगिक संस्था व म.न.पा.यांचे मध्ये प्रस्तुतच्या अटी व शर्ती विषयी कोणता ही वाद निर्माण झाल्यास तो सर्व प्रथम मा.आयुक्त पिंपरी चिंचवड मनपा यांचे एक सदस्य लवादाकडे सोपविण्याचा आहे. सदरील लवादाचे कामकाज भारतीय लवाद कायदा १९९६ च्या तरतुदीस अधीन राहून चालण्याचे आहे.लवादाने दिलेला निवाडा / निर्णय दोन्ही पक्षकारांवर बंधनकारक राहील

27 . बॅडमिंटन हॉलच्या स्लॉटचे प्रशिक्षणासाठी दिलेल्या क्रीडा संस्था/संघटना /मंडळ / क्लब/कंपनी/औद्योगिक संस्था व म.न.पा.यांचे मध्ये करारनाम्या बाबत कोणत्याही

प्रकारचा वाद मतभेद निर्माण झाल्यास तो मे.पिंपरी न्यायालय पिंपरी जिल्हा न्यायालय,पुणे यांचे कार्य कक्षेत राहील हे संबंधितांवर बंधनकारक राहिल.

28. बॅडमिंटन हॉलच्या स्लॉटचे प्रशिक्षणासाठी दिलेल्या क्रीडा संस्था/संघटना /मंडळ / क्लब/कंपनी/ औद्योगिक संस्था यांनी करारनामा करणेपूर्वी असा ठेकेदार / ठेकेदारी संस्था मनपाचे विदयमान नगरसेवक व स्वीकृत सदस्य यांचेशी संस्थेचा काहीही सबंध नाही याबाबत र.रु. ५००/- चे स्टॅम्प पेपरवर हमी पत्र करून दयावे लागेल.

29. .बॅडमिंटन हॉलच्या स्लॉटचे प्रशिक्षणासाठी दिलेल्या क्रीडा संस्था/संघटना /मंडळ / क्लब/कंपनी/ औद्योगिक संस्था यांनी मनपा बॅडमिंटन हॉल प्रशिक्षणासाठी घेतल्यानंतर कालावधी संपणेपूर्वी बॅडमिंटन हॉल मध्ये प्रशिक्षण देणेस असमर्थता दर्शविल्यास त्यांचा करारनामा रद्द करून भविष्यात त्यांना क्रीडा विषयक कोणतेही कामकाज देण्यात येणार नाही.

**लॉन टेनिस कोर्ट सरावासाठी व स्पर्धेसाठी - दरपत्रक**

| अ क्र | आरक्षणाच्या तपशील म.न.पा.चे सर्व लॉन टेनिस कोर्ट | प्रतिदिन एक तास सराव शुल्क दर र.रू. | प्रति महिना एक तास सराव शुल्क दर र.रू. | स्पर्धेसाठी १०.०० ते ४.०० दर र.रू. |
|---|---|---|---|---|
| १ | म.न.पा. शाळा विद्यार्थी | विनामुल्य | विनामुल्य | विनामुल्य |
| २ | २ ,४ एकत्रित ग्रुप नागरिकांसाठी | रु.२० | ६०० | ५०० |
| ३ | मनपा हदीतील खाजगी शाळांची मुले २,४ | रु.२० | ६०० | ५०० |

**( म.न.पा. काही क्रीडा सुविधांचे दर यापुर्वी निश्चित केले नव्हते. मा.महापालिका सभा ठराव क्र.४२१ दि.१८/०१/२०१४ अन्वये सदर क्रीडा सुविधांचे दरांस मान्यता दिली असून, मा.आयुक्त यांचेकडील विषयपत्र क्र.क्रीडा/७/कावि/१३१/२०१४ दि.१७/०५/२०१४ अन्वये खालील प्रमाणे २५ टक्के दर कमी करण्यात येत आहे.)**

**१ . म.न.पा. विविध क्रीडा सुविधा- दरपत्रक**

| अ.क्र. | क्रीडा सुविधा तपशिल | दर र.रू. | | अनामत र.रू. | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | ठरावक्र ४२१. .दि१८/१/ २०१४ अन्वये मंजूर दर र.रु. | सुधारित दर र.रू. | ठरावक्र ४२१. .दि१८/१/ २०१४ अन्वये मंजूर दर र.रु. | सुधारित दर र.रू. | |
| १ | म न पा स्क्वॅश कोर्टमोरवाडी , सरावासाठी प्रतिदिन प्रती तास दर | १०० | ७५ | ५०० | ३७५ | मक्रीडा , पा शाळा.न. प्रबोधिनी विद्यार्थी यांना क्रीडा सुविधा विनामूल्य उपलब्द करून देण्यात येईल . परंतू संबंधित शाळांनी किमान ३ |
| २ | टेबल टेनिस केंद्र सरावासाठी | ८० | **६०** | ३००० | २२५० | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | प्रतीदिन, प्रतीतास दर | | | | | महिने अगोदर लेखी अर्ज क्रीडा विभागास सादर करणे आवश्यक आहे. |
| ३ | स्पर्धेसाठी प्रती टेबल टेनिसचा प्रतीदिन , प्रतीतास दर | - | २५० | - | २२५० | |
| ४ | स्पर्धेसाठी प्रती टेबल टेनिसचा सते ००.१०. .सायं५ ००. करिता दर | २००० | १५०० | ३००० | २२५० | |